# विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया गुरुवारपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया गुरुवार (दि. २७)पासून प्रारंभ होणार आहे. सकाळी अकरा वाजता प्रवेशाची पहिली फेरी सुरु होईल. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाने मे आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात  ऑनलाईन आणि ऑफलाईन स्वरुपात परीक्षा घेतल्या होत्या. या परीक्षांनुसार गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली आहे. एम.एस्सी. आणि इतर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश फेऱ्यांना गुरुवारी (दि.२७) प्रारंभ होईल. त्यानंतर द्वितीय फेरी दि.२ जुलै रोजी, तर तृतीय प्रवेश फेरी दि. ५ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता विद्यापीठातील संबंधित अधिविभागांमध्ये होणार आहे. या फेऱ्यांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहिती प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

# विद्यापीठात २८ रोजी दिव्यांगांसाठी कौशल्य रोजगार मेळावा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात प्रथमच दिव्यांग विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी दि. २८ जून रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत मानव्य विद्या इमारतीमध्ये रोजगार व कौशल्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात महाराष्ट्रातील नामवंत कंपन्या सहभागी होणार आहेत.

बारावी उत्तीर्णपासून ते पदव्युत्तर पदवीधारकांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध केल्या जाणार आहेत. मेळाव्यात वेगवेगळे कौशल्य व उद्योजगता विकास याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सहभागी विद्यार्थ्यांसाठी चहा, नाष्टा व जेवणाची मोफत सोय केली आहे. सहभागी होण्यासाठी बायोडाटाच्या पाच प्रती, आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र व स्वतःचे रंगीत छायाचित्र आणणे गरजेचे आहे. मेळाव्याचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा, असे अवाहन कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे यांनी केले आहे.